# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 13 January 2026

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – १३ जानेवारी २०२६ सायंकाळी ६.१०**

****

- राज्यात १२ जिल्हा परिषदा तसंच १२५ पंचायत समित्यांसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर
- महापालिका निवडणुकांसाठीचा प्रचार थांबला–परवा मतदान
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा उद्या नामविस्तार दिन

आणि

- बीड जिल्ह्यात रामपुरी इथल्या बाल लैंगिक अत्याचार प्रकरणी आरोपीला वीस वर्ष तुरुंगवास

****

१२ जिल्हापरिषदा तसंच १२५ पंचायत समित्यांचा निवडणूक कार्यक्रम राज्य निवडणूक आयोगाने आज जाहीर केला. या निवडणुकीत येत्या ५ फेब्रुवारी रोजी मतदान होणार असून ७ फेब्रुवारी रोजी मतमोजणी होईल, मराठवाड्यात छत्रपती संभाजीनगर, परभणी, धाराशिव आणि लातूरसह राज्यातल्या पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या १२ जिल्हा परिषदांच्या आणि या जिल्ह्यातल्या पंचायत समितींसाठी या निवडणुका होणार असल्याचं, निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी आज मुंबईत वार्ताहर परिषदेत सांगितलं. १६ जानेवारीला निवडणुकीसाठीची सूचना जारी होऊन अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू होईल. या निवडणुकीचा सविस्तर कार्यक्रम जाहीर करतांना ते म्हणाले –

**बाईट – दिनेश वाघमारे**

मतदार यादीत १ जुलै २०२५ रोजी नाव असलेल्या मतदारांना या निवडणुकीत मतदान करता येईल. मतदारांना जिल्हा परिषदेसाठी एक आणि पंचायत समितीसाठी एक अशी प्रत्येकी दोन मतं द्यायची आहेत. नामनिर्देशन पत्र प्रक्रिया ऑफलाईन पद्धतीने राबवली जाणार असून, मतदान प्रक्रिया इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांवर घेतली जाणार आहे. २५ हजार ४८२ मतदान केंद्रांवर एक लाख १० हजार ३२९ मतदान यंत्रांच्या माध्यमातून या निवडणुका होणार असल्याचं, वाघमारे यांनी सांगितलं.

****

राज्यातल्या महापालिका निवडणुकांसाठीचा प्रचार आज थांबला. राज्यातल्या २९ महापालिकांमधल्या ८९३ प्रभागांमधल्या २ हजार ८६९ नगरसेवकपदांसाठी परवा मतदान होणार आहे. यासाठी एकूण १५ हजार ९३१ उमेदवार रिंगणात आहेत. परवा सकाळी साडेसात ते साडेपाच या वेळेत मतदान होणार आहे.

प्रचाराचा अखेरचा दिवस असल्यानं आज सगळ्या राजकीय पक्षांनी प्रचारावर लक्ष केंद्रीत केलं होतं. विभागात छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, लातूर आणि नांदेड इथं सर्वच पक्षाच्या तसंच अपक्ष उमेदवारांनी आपल्या प्रचार यंत्रणा पणाला लावल्याचं दिसून आलं.

****

महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना नेत्या आणि विधान परिषदेच्या उपसभापती डॉक्टर नीलम गोऱ्हे यांनी आज पुण्यात पत्रकार परिषद घेऊन, पुण्यात निवडणुकीत पैसे वाटण्यात आल्याचा आरोप केला. राज्य निवडणूक आयोगानं याबाबत तातडीनं कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली.

****

कल्याण–डोंबिवली महानगरपालिका निवडणुकीच्या प्रचाराच्या शेवटच्या टप्प्यात भाजप आणि शिवसेनेच्या कार्यकर्त्यांमध्ये हिंसक झटापट झाल्याचं वृत्त आहे. डोंबिवलीच्या तुकाराम नगर भागात ही घटना घडली. मतदारांना पैसे वाटल्याच्या आरोपावरून या भागात दोन रात्री तणाव होता. या घटनेत भाजपाचे दोन आणि शिवसेनेचे दोन पदाधिकारी जखमी झाले असून, पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

****

छत्रपती संभाजीनगर इथं कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी शहर पोलिसांच्या वतीनं आज पथसंचलन करण्यात आलं. कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलिस दल सतर्क असून, नागरिकांनी निर्भयपणे मतदान करावं, असं आवाहन छत्रपती संभाजीनगरचे पोलिस आयुक्त प्रवीण पवार यांनी केलं आहे.

****

छत्रपती संभाजीनगर इथं डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा नामविस्तार दिन उद्या साजरा होत आहे. यानिमित्त विद्यापीठाकडे जाणारे काही मार्ग उद्या सर्व प्रकारच्या वाहतुकीसाठी बंद असतील. नागरिकांनी पर्यायी मार्गाचा वापर करण्याचं आवाहन प्रशासनानं केलं आहे.

****

सूर्याचं उत्तरायण आणि शेतात कापणीला आलेल्या पिकांच्या आनंदाप्रित्यर्थ देशभरात उत्सव साजरा केला जात आहे. पंजाब, हरियाणा आणि उत्तर प्रदेशातही आज शेकोटी पेटवून, गाणी गात, पारंपारिक पदार्थांचा आस्वाद घेत लोहडीचा सण साजरा केला जातो तर दक्षिण भारतात अंगणात मांडलेल्या चुलींवर पोंगल म्हणजे खीर शिजवून सूर्याला अर्पण केली जाते. महाराष्ट्रात आज भोगी तर उद्या मकरसंक्रांत सण साजरा होणार आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सर्व देशवासियांना लोहडी, मकर संक्रांत, बिहू आणि पोंगलच्या शुभेच्छा दिल्या आहेत. देशाच्या समृद्ध कृषी परंपरांचे प्रतीक असलेले हे सण, राष्ट्रीय एकात्मतेची भावना प्रतिबिंबित करतात, असं राष्ट्रपतींनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

****

भटक्या प्राण्यांच्या संदर्भात गेल्या पाच वर्षात दिलेल्या मार्गदर्शन सूचनांची योग्य अंमलबजावणी झाली नसल्याबद्दल सर्वोच्च न्यायालयानं नाराजी व्यक्त केली आहे. आज यासंदर्भात झालेल्या सुनावणीत न्यायालयाने, भटक्या कुत्र्यांना सार्वजनिक ठिकाणी खाऊ घालणारे नागरिक आणि संस्थांवरही सर्वोच्च न्यायालयानं ताशेरे ओढले. भटक्या कुत्र्यांनी चावा घेतलेल्या व्यक्तींना मोठी नुकसानभरपाई द्यायला लावू, असं न्यायालयानं म्हटलं आहे. गेल्या वर्षी जुलै महिन्यापासून सर्वोच्च न्यायालय या मुद्द्यावर स्वत:हून सुनावणी घेत आहे.

****

बीड जिल्ह्यातल्या गेवराई तालुक्यातल्या रामपुरी इथल्या सहा वर्षांच्या मुलीवर झालेल्या लैंगिक अत्याचार प्रकरणातल्या आरोपीला वीस वर्ष कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली आहे. बीडच्या सत्र न्यायालयानं याप्रकरणी आरोपी सुंदर तातेड याला वीस वर्ष कारावास आणि दहा हजार रुपये दंड, अशी शिक्षा आज सुनावल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

लातूर इथल्या जवाहर नवोदय विद्यालयातल्या अल्पवयीन विद्यार्थिनीच्या मृत्यू प्रकरणी त्या विद्यालयातल्या दोन कर्मचाऱ्यांविरोधात अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंध अधिनियमाखाली गुन्हा नोंदवण्यात आला आहे. याशिवाय विद्यार्थिनीच्या कुटुंबियांना समाज कल्याण विभागाकडून चार लाख रुपये सहाय्य मंजूर करण्यात आलं आहे. जिल्हा प्रशासनानं ही माहिती दिली आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी आवश्यक उपाययोजना तातडीनं अमलात आणण्याचे निर्देश पोलिसांनी विद्यालयाच्या व्यवस्थापनाला दिले आहेत.

****

केंद्र सरकारने नुकतंच विकसित भारत जी राम जी विधेयक संमत केलं आहे. यामुळे गावातील विकासाची कामे गावातील नागरिकांना मिळणार असून वाढीव कामाच्या दिवसांसाठी धाराशि जिल्ह्यातील उपळे माकडाचे गावचे लाभार्थी केशव चंद्रकांत गुरव यांनी शासनाचे आभार मानले. ते म्हणाले –

**बाईट – केशव चंद्रकांत गुरव**

****

महिलांना रजोनिवृत्तीच्या काळात शास्त्रीय उपचार मिळावेत, या उद्देशाने आरोग्य विभागामार्फत विशेष 'मेनोपॉज क्लिनिक' सुरू करण्यात येत आहे. जिल्हा सरकारी रुग्णालयं, उपजिल्हा रुग्णालय, महापालिका रुग्णालयं तसंच निवडक ग्रामीण रुग्णालयांमध्ये उद्यापासून कार्यान्वित होणाऱ्या या केंद्रात दर बुधवारी याबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

****

छत्रपती संभाजीनगर इथं येत्या १६ ते १९ जानेवारी दरम्यान शार्ङ्गदेव महोत्सवाचं आयोजन करण्यात आलं आहे. महात्मा गांधी अभिमत विद्यापीठातील महागामी संस्थेच्या प्रमुख पार्वती दत्ता यांनी आज पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. चारही दिवस सादरीकरण, चर्चासत्र, शोधनिबंध सादरीकरण, आणि कार्यशाळा अशा चार मुख्य टप्प्यात होणाऱ्या या महोत्सवात यंदा आळंदी इथले वारकरी परंपरेचे प्रतिनिधी अवधूत गांधी, ज्येष्ठ गायिका अश्विनी भिडे देशपांडे, पद्मश्री नर्तकी नटराज, यांच्यासह पार्वती दत्ता यांचे शिष्यगण विविध कलांचं सादरीकरण करणार आहेत.

****

खाद्यपदार्थ तसंच इतर वस्तूंचा पुरवठा करणाऱ्या ई कॉमर्स कंपन्यांनी, दहा मिनिटांत वस्तू पोहोचवण्याची सेवा बंद करण्यावर सहमती दर्शवली आहे. गिग वर्कर्स म्हणजे या सेवा कंपन्यांसाठी काम करणाऱ्या अस्थायी कर्मचाऱ्यांची सुरक्षा आणि कामासाठी योग्य वातावरणाची निर्मिती, या उद्देशाने सरकारने या कंपन्यांना टेन मिनिट्स डिलिवरी सेवा बंद करण्यासंदर्भात सूचना केली. ब्लिंकीट या कंपनीने यावर तत्काळ अंमलबजावणी केल्याचं, याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****